

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'नंदादीप' या ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी शेजारी डॉ. व्ही. एन. शिंदे, अनिल मेहता, डॉ. सुनीलकुमार लवटे, रणधीर शिंदे, अवनीश पाटील, प्रभंजन माने, नीलांबरी जगताप आदी उपस्थित होते.

# वि. स. खांडेकर यांच्या साहित्याला आजही संदर्भमूल्य : डॉ. डी. टी. शिर्के

## शिवाजी विद्यापीठात 'नंदादीप' ग्रंथाचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २ : ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक वि.स. खांडेकर यांच्या साहित्याला आजही संदर्भमूल्य आहे. खांडेकर यांच्या सुवर्णस्मृती वर्षाचा आरंभ हा या ग्रंथाच्या प्रकाशनाने होत आहे, याचा आनंद वाटतो. या निमित्ताने पुढील वर्षभरात विद्यापीठाच्या मराठी विभागाने विविध उपक्रमांचे आयोजन करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे वि.स. खांडेकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित चर्चासत्रामधील निवडक व्याख्यानांचे 'नंदादीप' या डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे संपादित ग्रंथाचे कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रकाशन झाले. त्यावेळी ते बोलत होते. ज्येष्ठ प्रकाशक अनिल मेहता, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे, राम देशपांडे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. लवटे यांनी विद्यार्थीदशेपासून आपल्यावर खांडेकर यांच्या पडलेल्या प्रभावाचे विवेचन केले. माझ्या घडण्याचे संपूर्ण श्रेय हे खांडेकरांचेच असून, त्यांच्या ऋणातून उतराई होण्यासाठीच त्यांच्या अप्रकाशित साहित्याचे प्रकाशन करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. वर्षभरात खांडेकरांचे तीन प्रस्तावना खंड, दोन समीक्षा खंड, दोन कादंबऱ्या, एक चरित्रग्रंथ, एक पत्रसंग्रह आणि त्यांनी जपून ठेवलेल्या विविध वर्तमानपत्रांतून त्यांनी खुणा केलेले संदर्भ यांचा 'रायटर्स एट वर्क'च्या धर्तीवर मागोवा ग्रंथ असे एकूण दहा ग्रंथ प्रकाशित करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### आठवणी सांगितल्या...

खांडेकर यांचे लेखनिक म्हणून काम पाहिलेल्या श्री. देशपांडे यांनी खांडेकर हे माणूस म्हणून किती उच्च कोटीचे होते, हे दर्शविणाऱ्या अनेक आठवणी सांगितल्या. मेहता यांनी खांडेकरांचे समग्र साहित्य मेहता प्रकाशनामार्फत वाचकांना सादर करण्याचा आगळा आनंद आणि अभिमान वाटत असल्याचे सांगितले.



कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील, इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. दत्ता मचाले, सुखदेव एकल, रवी लोंढे उपस्थित होते. दरम्यान, या कार्यक्रमापूर्वी विद्यापीठाच्या वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे खांडेकर यांच्या ४९व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. राजश्री बारवेकर, चंद्रकांत लंगरे, उदयसिंह राजेयादव उपस्थित होते. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 SEP 2025
पुण्यनगरी

# शंकर पाटील यांच्या साहित्य समीक्षेची गरज

## -राजन गवस

**कोल्हापूर प्रतिनिधी**

शंकर पाटील हे मराठीतील एक अव्वल दर्जाचे लेखक होते. ग्रामीण विनोदी कथाकथनकार म्हणून त्यांचा लौकिक असला तरी त्यांनी केलेले गंभीर लेखन अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याची नीट समीक्षा होण्याची आवश्यकता आहे, असे मत साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी व्यक्त केले.

ग्रामीण साहित्यिक शंकर पाटील यांचे जन्मशताब्दी वर्ष आठ ऑगस्टपासून सुरू झाले आहे. मूळचे कोल्हापूर जिल्ह्यातील पट्टणकोडोली येथील रहिवासी असलेले शंकर पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने दिनमान साहित्य उत्सवात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये डॉ. गवस बोलत होते.

यावेळी प्रसिद्ध अभिनेते मिलिंद शिंदे यांनी पाटील यांच्या 'बंधारा' या गंभीर कथेचे अभिवाचन करून उपस्थितांना हेलावून सोडले. कथाकार बाबासाहेब परीट यांनी 'धिंड'चे कथाकथन केले. शिवाजी विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने 'कथा अकलेच्या कांद्याची' या नाटकातील प्रवेश सादर केला, तर 'तिसरी घंटा'च्या वतीने 'पाळणा' या कथेवरील एकांकिका सादर केली.

प्रमुख वक्ते नामदेव माळी यांनी पाटील यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये सांगितली. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 SEP 2025

तरुण भारत

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र प्रवेश परीक्षेचा अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठामध्ये विविध विभागामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात प्रवेश दिला जातो. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेअंतर्गत एस. सी., एस. टी., ओबीसी, ई.डब्ल्यू एस (नॉन क्रिमीलेयर) व अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, आणि जैन) आणि खुल्या गटातील आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येतो. या केंद्राच्या प्रवेश परीक्षा अर्जासाठी ४ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रवेश परीक्षा ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी चार ते साडेपाच या वेळेत ऑफलाईन पद्धतीने होईल. ही परीक्षा मानव्यशास्त्र इमारतीमधील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात होणार आहे.